**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक:-७**
**सन. २००७-२००८**

विषय क्रमांक :-१ सोमवार दिनांक १०/९/२००७

ठराव क्रमांक :- १ सोमवार दिनांक१०/९/२००७

**प्रस्तावाचा विषय** :-मा.स्थायी समिती सभा दिनांक ३/८/२००७रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर** :- मा.स्थायी समिती सभा दिनांक ३/८/२००७ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती पुढे सादर

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.सदस्यांनी इतिवृत्ता बाबत आपल्या सुचना, दुरूस्त्या सांगाव्यात.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मागिल सभा दिनांक ३/८/२००७ रोजी चे सभेचे इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- इतिवृत्त कायम करावे.

मा.श्री. त्रिपाठी .सु.चं. :- मागिल सभेचे ठराव क्रमांक एक मध्ये सन-२००७-२००८ साला करिता दैनंदिन कामकाजा साठी एस.के. एफ बेअरींग, इत्यादी वार्षिक खरेदी विषयी "स्टोअर पोहच होणा-या साहित्य माल इत्यादीचे मानांकित उत्पादक कंपणीचे लेटर हेड असलेले बील घेण्यांत यावे" या ऐवजी "मंजूर निविदाकार यांचे कडून स्टोअर पोहोच होणा-या साहित्य माल इत्यादीचे मान्यता प्राप्त फर्मचे बील घेण्यांत यावे या प्रमाणे दुरूस्ती केलेली आहे. परंतु त्यातुन वेगळा अर्थ निधू शकेल. एस.के. एफ बेअरीग ची एजन्सी शेटीया ट्रेडर्स कडे आहे. आपण सुनिल ट्रेडर्स चे दर मंजूर केलेल आहेत. एस.के.एफ बेअरींगचे तो शेटीया ट्रेडर्स चे लेटर हेड वरील बील देणार नाही"

मा.श्री. जोशी अ.सु. :- शेटीया ट्रेडर्सचे बील तो घेईल एस.के. एफ बेअरींग कंपनीचे देणार नाही

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- शेटीया ट्रेडर्स चे बील येईल एस.के.एफ.कंपणीचे येणार नाही .आपण सुनिल ट्रेडर्सचे बील स्विकारणार का.?

मा.श्री. जोशी अ.सु. :- आपण फर्मचेच बील घेणार ना.?

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- आय एस आय ट्रेड मार्क असलेले कंपनीचे मान्यता प्राप्त फर्मचे बील घेण्यांत यावे आपण पुरवठादार सुनिल ट्रेडर्स बील देईल पण आपल्याला ओरीजीनल मालाचा पुरवठा होईल खाची खात्री काय?

मा.श्री.जोशी अ.सु.:- सप्लायर प्रथम खरेदी करतो, तो बील घेउनच खरेदी करतो, तोच बिल आपल्याला देईल.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपण जाहीर निविदा मागवितो एक्स वाय झेड निविदा भरतात आपण मंजूर दराने खरेदी करतो त्या मालाचे मंजूर निविदाधारक त्याचे लेटर हेड वरील बील देईल. ऑथराईज डीलर व सप्लायर्स हे वेगवेगळे असतात.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- भविष्यातील अनैतीक कामास आला बसविण्यासाठी आपण ऑथराईज डिलरचे बील घेण्याबाबत दुरूस्ती करावी. गाडी रिपेअर साठी आपण ऑथराईज डिलर कडे दिल्यास त्याचे बील ऑथराईज डिलर चे मिळते तसे आपणास ऑथराईज डिलरचे बील मिळावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- या पुढील काळात ज्यांचे कडेस कंपणीची एजन्सी आहे.जे ऑथराईज डिलर, सब डिलर आहेत, त्यांचेच टेंडर स्विकारले जाईल अशी जाहीर टेंडर नोटीस मध्ये अट टाकावी. एजन्सी नसल्यास सब डिलर नेमणूक असली पाहिजे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- ऑथराईज डिलर टेंडर भरणार नाहीत.

मा.श्री. जोशी अ.सु :- डिलर सब डिलर नेमू शकतो.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ऑथराईज डिलर सब डिलर तसेच रिटेलर ही माल पुरवू शकतो.

मा.श्री.त्रिपाठी सु.च.:- शेटीया ट्रेडर्स कडे जाउन आपण बेअरींग खेरदी करू शकतो. त्याचे टेंडर काढायची आवश्यकता काय आपण शेटीया कडून माल घेतल्यास कुनी वाद दावा केल्यास आपणास अडचण येणार नाही.

मा. सभापती साहेब :- आपले अत्यावश्यक काम अडून पडल्यास ?

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- डायरेक्ट खरेदी करावी मागे बेअरींग ची खरेदी केलेली नाही. औरंगाबाद, सोलापूर वाले नगर मधून इलेक्ट्रीक माल खरेदी करतात आणि आपण मुंबई वाल्या कडून खरेदी करतो मागणी नोंदवून ती पूर्ण होण्यास वेळ जातो. यापुढे मान्यता प्राप्त कंपणीचे मान्यता प्राप्त अधिकृत्त डीलर, सब डिलर सप्लायर्स यांचे कडून माल खरेदी करावा व यांनीच टेंडर भरावे अशी वार्षिक खरेदीचे जाहीर निविदे मध्ये अट टाकावी.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- इतिवृत्त मंजूर करावे .

मा.सभापती साहेब :- मा.सदस्यांचे सुचने नुसार पुढील वर्षीचे वार्षिक खरेदी कामी निविदा मागवितांना मानांकित कंपणीचे ऑथराईज डिलर,सब डिलर यांचेच निविदादर स्विकारले जातील अशी अट नमुद करून जाहिर निविदा दर मागविणेत यावेत मा.स्थायी समिती सभा दिनांक ३/८/२००७ रोजीचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देणेत येत आहे.

**ठराव** :- मा.स्थायी समिती सभा दिनांक ३/८/२००७ रोजी च्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी सभे मध्ये झालेल्या साधक बाधक चर्चे नुसार ठरविण्यांत येते की पुढील वर्षीचे वार्षिक खरेदी कामी जाहीर निविदा दर मागवितांना मान्यता प्राप्त कंपणीचे ऑथराईज डिलर,सब डिलर यांचेच निविदा दर स्विकारले जातील अशी अट नमुद करून जाहीर निविदा दर मागविणेत यावेत. मा.स्थायी समिती सभा दिनांक ३/८/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

अनुमोदक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-७**
**सन. २००७-२००८**

विषय क्रमांक :-२ सोमवार दिनांक १०/९/२००७

ठराव क्रमांक :- २ सोमवार दिनांक १०/९/२००७

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील आयुर्वेद महाविद्यालय ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सिना नदीवर व सारसनगर येथील भिंगार नाल्यावर १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत पुल बांधणे कामी एस्टीमेट रू. १ कोटी ३३ लाखाचे खर्चास व सदर रक्कम मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडेस वर्ग करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- विषय - १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत सारसनगर येथे पुल व आयुर्वेद कॉलेज ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर पुल बांधणे.

१२ व्या वित्त आयोगांतर्गत सारसनगर येथे पुल बांधणे व आयुर्वेद कॉलेज ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर पुल बांधणेचे काम सार्व. बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन अ.नगर यांचे कडून करून घेणे बाबतचे कार्यालयीन प्रस्तावास मा.स्थायी समिती ठराव नं. २ दिनांक २८/२/०७ अन्वये मान्यता देण्यात आली.

अहमदनगर महानगरपालिकेची उपरोक्त दोनही कामाचे अंदाजपत्रके (आयुर्वेद कॉर्नर ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सिना नदीवर पुल बांधणेचे रक्कम रू. ४१,७४,४३०/- व सारसनगर येथे भिंगार नाल्यावर पुल बांधणेचे अंदाजपत्रकीय रक्कम रू. २० लाख) एकूण रक्कम रू. ६१,७४,४३०/- खर्चाचे अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीचे प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानुसार कार्यकारी अभियंता सा.बा.महाराष्ट्र शासन, अ.नगर यांचेकडेस पुलाचे पायाची चाचणी व सर्वेक्षण करणेकामी रू. १,२१,५६८/- ची रक्कम संदर्भिय पत्र क्र. ६ अन्वये जमा करण्यात आली.

तद्नंतर संदर्भिय पत्र क्र.७ अन्वये मा. कार्यकारी अभियंता सार्व. बांधकाम विभाग अ.नगर यांनी उपरोक्त दोन्ही पुलाचे सन-२००७-२००८ च्या मंजुर दरसुची नुसार अंदाजपत्रके तयार करण्यात आली असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे.

**१] आयुर्वेद महाविद्यालय ते काटवन खंडोबा दरम्यान सिना नदीवर पुल बांधणे.**

| | |
|---|---|
| -पुलाची लांबी - | ५० मीटर (१० मीटरचे ५ गाळे) |
| -पुलाचा प्रकार- | आर.सी.सी. |
| - पुलाची उंची- | ८.११ मीटर (पायापासून) |
| -रूंदी - | ७.५ मीटर |
| -जोड रस्त्याची लांबी- | ७६ मीटर्स. |

**२] सारसनगर येथील भिंगार नाल्यावरील पुलाचे काम.**

| | |
|---|---|
| -पुलाची लांबी - | १५ मीटर (५ मीटरचे ३ गाळे) |
| -पुलाचा प्रकार- | आर.सी.सी.राफ्ट |
| - पुलाची उंची- | ४.१२ मीटर (पायापासून) |
| -रूंदी - | ७.५ मीटर |
| -जोड रस्त्याची लांबी- | ८३ मीटर्स. |

या व्यतिरिक्त उपरोक्त कामाच्या अंदाजपत्रकामध्ये पर्यायी वळण रस्ता बांधणे, मोरीचे बांधकाम करणे तसेच विदयुत खांब हलविणे या बाबी समाविष्ट केल्या आहेत. त्यानुसार दोन्ही पुलांची अनुक्रमे अंदाजित खर्च रक्कम रू. ९२.०० लाख व रक्कम रू. ३३.०० लाख इतकी येत असल्याचे नमुद केले आहे. व त्यावर ६.२५% रक्कम रू.७.८३ लाख अंदाजपत्रकासाठी सर्वेक्षण व कामाची देखरेख करणे असे एकूण रू. १३३.०० लाख इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे.

त्यानुसार सदरची रक्कम मा.कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, अ.नगर यांचेकडेस वर्ग करणे आवश्यक आहे.

भिंगार नाल्यावर पुल बांधणे व आयुर्वेद महाविद्यालय ते काटवन खंडोबा दरम्यान सीना नदीवर पुल बांधणे अशा दोन कामास व अनुक्रमे रक्कम रू.२०.०० लाख व रू. ४१.७४ लाख अशा रकमेच्या प्रस्तावास शासनाचे पत्र क्र. बाविआ-१००६/५१५/प्र.क्र.९० /२००६/ नवि-१६ दि. २०/१/०७ अन्वये रस्ते व पुलाचे काम करण्यास नागरी संस्था स्वतंत्र असल्याने १२ व्या वित्त आयोगाचा निधी खर्च करण्यास शासनाच्या पुर्वमान्यतेची आवश्यकता नाही. असे नमुद केले आहे.

सार्व.बांधकाम विभाग, अ.नगर यांनी एकूण १.३३ कोटी रकमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे. शासनाने २०+ ४१.७४ अशा एकुण ६१.७४ लाख रकमेस मान्यता दिली आहे. सद्यास्थितीत उपरोक्त पुलांची कामे करणे आवश्यक असल्याने रक्कम रू. १३३-६१.७४= ७१.२६ लाख इतका निधी तुर्त म.न.पा. फंडातुन वर्ग करावा लागणार आहे.

दरम्यान १२ व्या वित्त आयोगातून रू.७१.२६ लाख इतका निधी प्राप्त करून घेणेसाठी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडेस पाठपुरावा करणे आवश्यक आहे, तसेच पुलांची कामे करणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणे उचित वाटते.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचे अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- मागील वेळेचे या पुलांचे एस्टीमेंट कुनी तयार केले होते.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- कार्पोरेशनने केले होते.

मा.श्री. तिवारी सु.र. :- मागील वेळी स्थायी समिती मध्ये या कामाचे एस्टीमेट वाढले तर मंजूरी देउ तसेच २० लाखापेक्षा जास्त खर्च वाढल्यास त्यास मा.स्थायी समिती ची मंजूरी घेण्यांत यावी असे ठरले होते. आता सदर कामांचे एस्टीमेट वाढण्याचे कारण काय ?

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- रस्त्याची लांबी, उंची या मध्ये वाढ झालेली आहे. लांबी ३७ ची ५० मीटर, उंची ८.११ ची ९.६६ मी. धरली आहे. तसेच भिंगार नाल्या वरील पुलाची उंची रस्त्याची लांबी ही वाढलेली आहे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- आपण एस्टीमेट केले ते ४१ लाखाचे होते ते वाढून एस्टीमेट ९० लाखाचे झालेले आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- चुकीचे एस्टीमेट झाले आहे. भिंगार नाल्या वरील पुलाची लांबी वाढते आपले लोक सक्षम नाहीत हे त्या वरून दिसते.

मा.श्री. तिवारी सु.र. :- आता शहर अभियंता म्हणून श्री. पालवे साहेब आपले कडेस आलेले आहेत. त्यांनी अशा कामांचे एस्टीमेट केलेले असेल.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- पी डब्ल्यु डी चे डी एस आर रेट प्रमाणे एस्टीमेट करणेत आले आपल्या शहराच्या समस्यांचे गांभिर्य आपणास समजलेले नाही. सारसनगर पुला ची उंची ४.१२ मीटर धरलेली आहे. ती पाया पासून धरली किंवा कसे

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी.:- बेड कॉक्रीट पासून उंची धरलेली आहे.

मा.श्री.त्रिपाठी सु.च :- उंची ७ ते ८ मीटर असावी त्यामुळे पुला खालून चांगले पाणी वाहील.

मा.श्री. तिवारी सु.र. :- पुलाची उंची ४.१२ मीटर धरली आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.च :- ती पाया पासूनची आहे.

शहर अभियंता श्री. पालवे :- या कामात ट्रायलपीट घेतले जाते. त्यात मॉडीफिकेशन सतत होत रहाते पुलाची उंची २० फूटा पर्यत जाईल.

मा.श्री. त्रिपाठी सु.च :- उंची ४.१२ मीटर दिलेली आहे.

मा.श्री. तिवारी सु.र. :-उंची २१ फूटापर्यत जाते.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- सध्याच्य पुला पेक्षा सात ते आठ फूट उंची असावी अशी दूरूस्ती करावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- पुलाची उंची ठरविणे हे तंात्रिक काम आहे. बी ॲन्ड सी ठरविल त्याप्रमाणे पुलाची उंची रूंदी बाबत नियमाप्रमाणे ते चांगले काम करतील आपण काही दूरूस्त्या केल्यास एस्टीमेट रक्कम बदलते.

मा.श्री. जोशी अ.सु. :- श्री. त्रिपाठी साहेब त्या भागाचे नगरसेवक आहेत. श्री. पालवे साहेबांनी त्याचेशी चर्चा करून काय ते ठरवावे तुर्त विषय मंजूर करावा.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- मंजूर करावा

मा.श्री. तिवारी सु.र. :- मंजूर करा परंतु सदर पुलांची कामे मुदतीत व्हावी त्यांना मुदत द्यावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.र. :- या भागातील कानडे मळा, चिपाडे मळा येथील नाल्यांवर बांधावयाचे पुलांचा निधी सारसनगर पुलाचे कामी वळविलेला आहे. सारसनगर येथील जुना पुल तोडल्या नंतर कानडे मळा चिपाडे मळा येथील नागरिकांची गैरसोय होईल

मा.श्री. जोशी अ.सु. :- रस्त्यांचे डायव्हर्शनची जबाब दारी ही ठेकेदाराची आहे. तो ते पाहून घेईल.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- चिपाडे मळा व कानडे मळयाचे पुलाचे तीस लाखाचा निधी सारसनगर पुलाचे कामी वर्ग करणे ऐवजी भूसंपादनासाठी असलेला निधी इकडेस वळवावा कानडे मळा चिपाडै मळा येथील पुलांची कामे व्हावीत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- तेथील लोकच वाहतुकीची पर्यायी व्यवस्था झाल्या शिवाय पुल तोडू देणार नाहीत.शहर अभियंता श्री पालवे यांनी सदर भागाची पहाणी करावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- चिपाडे मळा कानडे मळा येथील नाल्या वरील पुलांची कामे व्हावीत हे काम ही लवकर व्हावे.

मा.सभापती साहेब :- कानडे मळा चिपाडे मळा येथील नाल्या वरील पुलांची कामे ही करण्यात यावे.

मा.सौ. भागानगरे म.प्र. :- नागरिकांचे सोई साठी सदरचे पुलांची कामे लवकरात लवकर व्हावीत ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते कार्यालयीन प्रस्ताव मंजूर.

**प्रस्तावाचा विषय** :- अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील आयुर्वेद महाविद्यालय ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सिना नदीवर व सारसनगर येथील भिंगार नाल्यावर १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत पुल बांधणे कामी एस्टीमेट रू. १ कोटी ३३ लाखाचे खर्चास व सदर रक्कम मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडेस वर्ग करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील आयुर्वेद महाविद्यालय ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सिना नदीवर व सारसनगर येथील भिंगार नाल्यावर १२ व्या वित्त आयोगा अंतर्गत पुल बांधणे कामी एस्टीमेट रूपये. एक कोटी तेहतीस लाखाचे खर्चास तसेच सदर रक्कम मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन, अहमदनगर यांचे कडेस वर्ग करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. मात्र सदर पुलांची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यांत यावीत. तसेच सारस नगर येथील जूना पुल तोडल्या नंतर त्या भागातील नागरिकांना वाहतुकीस पर्यायी मार्ग नसल्यामळे चिपाडे मळा, कानडे मळा येथील नाल्या वरील पुलांची दुरूस्ती प्रशासनाने ताबडतोब करावी. ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. त्रिपाठी सु.च.

अनुमोदक :- मा.सौ. भागानगरे म.प्र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.